# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/०१/२०१८

## चंदनाची तस्करी करणारी टोळी गजाआड - ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाची कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी जिल्हयातील महामार्गावरील अवैध धंदे, तसेच महामार्गांवर अवैधरित्या होणारी वाहतुक, महामार्गावरील दरोडा व जबरी चो-यांना प्रतिबंध व्हावा यासाठी ग्रामीण पोलीस दलाचे विशेष पथक, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, तसेच एडीएस मोबाईल व्हॅन वरील अधिकारी कर्मचारी यांना सतर्क रात्रगस्त घालणेबाबत सुचना दिलेल्या आहे. त्यानुसार ग्रामीण पोलीसांचे विशेष पोलीस पथकाने आज रोजी पहाटेचे सुमारास चांदवड येथील मंगरूळ टोलनाका परिसरात चंदनाची अवैधरित्या तस्करी करणारे ०३ इसमांना ताब्यात घेतले.

दिनांक ०५ जानेवारी २०१८ रोजी ग्रामीण पोलीसांचे विशेष पथक मुंबई आग्रा महामार्गावर गस्त घालत होते. दरम्यान मा.पोलीस अधीक्षक सो यांना मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे मालेगावकडुन नाशिक शहराकडे काही इसम एक हयुंदाई वरणा कारमध्ये चोरटया रितीने चंदनाची लाकडे घेवुन वाहतुक करीत आहे बाबत समजलेवरून ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकातील **पोलीस उपनिरीक्षक श्री. भरत चौधरी** यांनी त्यांचे पथकासह मंगरूळ टोलनाका परिसरात पहाटे ०५:३० वा. चे सुमारास एक हयुंदाई वरणा कार **क्र.एम.एच.०२.सी.एच.४५०१** मधील इसमांवर छापा टाकला. सदर ठिकाणावरून **इसम नामे १) राकेश मधुकर वाघ,** वय २६, रा.जाजुवाडी, मालेगाव, **२) तात्या काळु पवार, वय २०,** रा. निळगव्हाण, ता.मालेगाव, **३) निशान मारूती पवार, वय २७ रा. निळगव्हाण,** ता.मालेगाव यांना जागेवरच ताब्यात घेण्यात आले. सदर इसमांचे ताब्यातील कारची झडती घेतली असता डिक्कीमध्ये **३,६८,६०० रू. किंमतीचे मौल्यवान चंदनाची** लाकडे मिळुन आली. ताब्यात घेतलेले वरील ०३ इसम व ह्युंदाई वरणा कारसह ३,६८,६०० रू.चे चंदनाची लाकडे असा **एकुण १०,६८,६०० रू. मुद्देमाल** चांदवड पोलीस ठाणेस हजर करण्यात आला असुन सदर इसमांविरूध्द भादवि कलम ३७९, सह भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१-२(ब), तसेच महाराष्ट्र वन नियमावली २०१४ चे नियम ३१,३५,५५ चे उल्लंघन ८२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथकाचे पोउनि श्री. भरत चौधरी, पोना कोरडे, संवत्सरकर, गांगुर्डे, पोकॉ मराठे, आहेर अशांचे पथकाने सदरची कामगिरी केली आहे.